# पार्किन्सन्सचा विकार

- डॉ. नटराज द्रविड
एम.डी. (मेडिसिन)

पार्किन्सन्स डिसीजसाठी काही अत्यंत गुणकारी आयुर्वेदीक औषधे सहज उपलब्ध आहेत.या औषधांचे वैशिष्ट्य म्हणजे पार्किन्सचा आजार ही औषधे अॅलोपॅथीच्या औषधांपेक्षा अधिक उपयुक्त ठरतात. या वनस्पती पुढीलप्रमाणे आहेत.

**१) कवचबीज :-** खाजकुईलीचे बी (Mucuna Prunsite, Doliches Prurisis Fabaicae)

किंग पळस वर्गातील ही एक वेल आहे. या वेलीला दोन ते तीन इंच लांब किरमिजी रंगाच्या शेंगांचे घोस येतात. शेंगांवरील कूस आपल्या अंगावर लागल्यास मोठ्या प्रमाणात खाज येते. शेंगेतील बीया या आजारासाठी उपयुक्त आहेत. शेंगातील बिया डाळ वर्गातील असल्यामुळे बऱ्याच ठिकाणी डाळींऐवजी शिजवून खाल्ल्या जातात. बाजारात पांढऱ्या, मोठ्या पंजाबी बिया व पश्चिम घाटावर मिळणाऱ्या काळ्या बारीक बिया मिळतात. दोन्हींपैकी पश्चिम घाटावरील मिळणाऱ्या बिया अधिक उपयुक्त आहेत. रोज १ ते २ ग्रॅम एवढे बियांचे चूर्ण औषध म्हणून उपयोगी ठरते. या बियात ट्रिप्सीन इनहीबीटर म्हणून एक द्रव्य असते. त्यामुळे प्रथिनांच्या पचनाला अडथळा येऊन गॅसेसचे प्रमाण वाढू शकते. याकरता सर्वात सोपा उपाय म्हणजे बिया शिजवून त्यानंतर वाळवून त्याचे चूर्ण करून वापरावे. बियांमध्ये नैसर्गिक रीत्या एल डोपा हे रासायनिक द्रव्य मोठ्या प्रमाणात असते. या शिवाय इतरही काही रासायनिक द्रव्ये असतात.

या आजारातील स्नायूंचा कडकपणा व थरथर पहिल्या दिवसापासून कमी होते. कमी झालेली हालचाल करण्याची क्षमता तशीच एक महिन्यानंतर वाढू शकते. ही वनस्पती रोगप्रतिबंधक गुणधर्माची असल्यामुळे हृदयरोग, संधीवात यावरही चांगला परिणाम घडवते. मधुमेही रुग्णांना रक्तातील साखरेचे प्रमाण ३०ते ४० टक्क्यांपर्यंत कमी करण्यास ही वनस्पती उपयुक्त आहे. या वनस्पतीमुळे स्मरणशक्ती वाढते व नपुंसकताही कमी होते.

**२) अश्वगंधा :-** बटाटा कुळातील ही वनस्पती (witharia somnifara) एक नगदी पीक म्हणून वापरले जाते. बाजारात ती 'नागोरी अश्वगंधा' या नावाने मिळते. उकिरड्यावर व नैसर्गिक रीत्या वाढलेली अश्वगंधा विषारी आहे व औषध म्हणून वापरता येत नाही. पार्किन्सन रोगामध्ये या वनस्पतीच्या मूळांचे चूर्ण कवच बीज या चूर्णाबरोबर १:२ वापरावे. ही वनस्पती देशी तुपाबरोबर वापरली असता अधिक परिणामकारक ठरते. कवचबीजाप्रमाणेच अश्वगंधा ही वनस्पती सुद्धा आयुर्वेदाने रसायन म्हणून गणली आहे. आपले वजन कमी करण्यासही या वनस्पतीचा वापर परिणामकारक ठरतो. अतिरिक्त प्रमाणात (प्रमाणापेक्षा जास्त) अश्वगंधा वापरल्यास तोंड येणे, हृदयातली धडधड होणे तसेच, मूळव्याध हे दोष येऊ शकतात.

**३) छोटे गोखरु, गोक्षुळ (Tribulus Turrois)**

गोखरु ही वनस्पती माळावर व जेथे पाऊस कमी असतो अशा ठिकाणी सर्रास वाढते. बल्य वनस्पतीत गोखरु अग्रगण्य आहे. या आजारातील अशक्तपणा व तोंडातून लाळ येणे हे गोखरुचूर्णामुळे ताबडतोब कमी होते.

व्यवहारात वापरताना ३ ग्रॅम कवच बीज चूर्ण, १ ग्रॅम अश्वगंधा व २ ग्रॅम गोखरुचूर्ण याबरोबर पाव चमचा कंकोळ चूर्ण एकत्र करुन एक चमचा तुपाबरोबर सकाळी घ्यावे.

माझ्याकडे आलेल्या पार्किन्सनच्या अनेक रुग्णांवर मी वरील औषधोपचार केला व त्याचा त्यांना खूपच फायदा झाला.

र.नं. ५४३४६२
भ्रमणभाष : ९४२२४००८८८